वि.दि.दा.क्र. ७८/२०२३
रविंद्र वि. सुमन
निशाणी क्र. ३४

वादीतर्फे साक्षीदार क्र.१
मी शपथेवर सांगतो की,

<u>पुढील सरतपास वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. देवळे यांच्यातर्फे शपथेवर सुरु-</u>
निशानी ५७ वरील आदेशान्वये सरतपास घेण्याची परवानगी देण्यात आलेली आहे

३. साक्षीदाराला नि.५९ वरील बोरवेलची रिशिप्ट, बिल्डरने कंपाउंड वाल केल्याबाबतची रिशिप्ट, दावा मिळकतीचे फोटोग्राफ्स आणि फोटोग्राफ्सच्या बिलाची पावती इत्यादी दाखल केले आहे. सदर कागदपत्रांना अनुक्रमे आर्टीकल ‘ए’ ते ‘जी’ देण्यात येत आहे.

<u>सरतपास पुर्ण</u>

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे विद्वान वकील श्री. व्ही. आर. बोरकर यांद्वारे</u> सुरु-

४. मी १९८१ पासुन ते २००५ पर्यंत मी भारतीय हवाई दलामध्ये होतो. सन १९९० मध्ये मी उत्तर भारत, सियाचिन या झोनमध्ये मी कार्यरत होतो. सन १९९० मध्ये मी नागपुर मध्ये नव्हतो. बाला लांजेवार यांना मी ओळखत नव्हतो. एजाज सलीम खान हे माझे वर्ग मित्र आहेत त्यामुळे त्यांची आणि माझ्या पत्नीची ओळख होती. दिनांक ३/०३/११९० च्या खरेदी पत्राची माहिती मला त्यावेळेस समजली होती. मला माझा मित्र एजाज सलीम खान याने त्याची माहिती दिली होती. कधी माहिती सांगितली 14 pt हे मी सांगु शकत नाही. सन १९९० मध्ये माझी पत्नी गृहीनी होती. त्यावेळेस माझ्या पत्नी म्हणजे रंजना हिच्याजवळ उत्पन्नाचे कोणतेही साधन नव्हते. हे म्हणणे खरे नाही की खरेदी पत्रामध्ये रंजना केवळ औपचारिक लिहून घेणार म्हणुन होती, तिने कोणताही मोबदला बाला लांजेवार याला दिला नाही.

५. कोणत्या गट जमिनीचे खरेदी पत्र झाले होते याची मला माहिती नाही. जमीनीचे क्षेत्रफळ अंदाजे २.६ एकर खरेदी करण्यात आले होते. खरेदी पत्रामध्ये मोबदला हा, रोख स्वरुपात करण्यात आला होता. रंजना आणि एजाज खान यांनी किती रक्कम दिली हे मी सांगु शकत नाही. हे मला माहित नाही की त्यानंतर फेरफारसाठी एजाज सलीम खान यांनी अर्ज केला होता.

६. दिनांक २४/०५/१९९० च्या खरेदीपत्राची मला माहिती आहे. कोणाकडुन खरेदी केली याची मला माहिती नाही. माझी पत्नी रंजना हिचा मृत्यु १२ मे २०१६ मध्ये झाला आहे. मी हवाई दलातुन निवृत्त झाल्यानंतर मुंबई येथे राहत होतो. मी माझ्या शपथपत्रामध्ये मुंबईमध्ये राहत असल्याचा उल्लेख केला नाही कारण मला आवश्यकता वाटली नाही. माझी पत्नी रंजना हिचा मृत्यु मुंबई येथे झाला. रंजना यांना वारस म्हणुन मुलगा आणि मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की मी मे, २०१८ मध्ये नागपुर जिल्हयामध्ये आलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की मला दिनांक २४/०५/१९९० रोजीच्या खरेदीपत्राची माहिती नाही. मी तलाठी कार्यालयामध्ये कधी गेलो होतो हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २४/०५/१९९० रोजी माझ्या पत्नीने प्रतिवादी क्र.२ कडुन कोणतेही खरेदीपत्र केले नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २४/०५/१९९० चे खरेदीपत्र खोटे असल्यामुळे त्याचा फेरफार मी केला नाही. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी कोर्टात खाटा दावा दाखल करुन खोटे शपथपत्र देउन खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.३ तर्फे एस. आर. चक्रवर्ती यांद्वारे</u>-

७. सन १९७९-८० मध्ये एजाज खान हे माझ्यासोबत कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. त्यानंतर त्यांनी चार वर्ष वकीलीचे शिक्षण घेतले त्यानंतर एजाज खान वकील झाले. मी सन १९८१ साली हवाई दलात रुजु झालो. एजाज खान हे मागिल दहा वर्षापासुन सी.बी.आय. मध्ये होते. एजाज खान यांचे वय सध्या ६५ वर्ष आहे. एजाज

खान हे कोणत्या वर्षी सी.बी.आय. मध्ये लागले याची मला माहिती नाही. एजाज खान हे कोणत्या वर्षी वकील झाले आणि किती वर्ष प्रक्टीश केली याची मला माहिती नाही. हे मला माहित नाही की एजाज खान हे ले-आउटचा, प्लाटींगचा धंदा करत होते अथवा शेतीचा व्यवसाय करत होते. हे म्हणणे खरे नाही की एजाज खान कधीही नागपुर मध्ये राहत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की एजाज खान यांना शेतीचे कोणतेही काम येत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की माझी पत्नी रंजना हिला देखिल शेतीचे कोणतेही काम येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, शेतकरी नसतांना देखिल, कोणतीही परवानगी न घेता, दिनांक २४/०५/१९९० चे खरेदी पत्र बेकायदेशीर पणे करण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, एजाज खान, माझी पत्नी आणि मी, आम्ही बाला लांजेवार, प्रभु लांजेवार, प्रतिवादी क्र.२ यांना पाहिले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की नाव सध्या माझ्या लक्षात नाही, जे लोक उपस्थित होते त्यांच्याकडुन खरेदी पत्र झाले. सन १९९० मध्ये माझी पत्नी नागपुर मध्ये होती. त्यावेळी माझ्या पत्नी सह माझे वडील, माझे दोन भाउ, त्यांच्या पत्न्या आणि माझा एक लहाण मुलगा इत्यादी राहत होते. सन १९९० मध्ये माझ्या पत्नीची वय अंदाजे २८ वर्ष होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पत्नीचे वय सन १९९० मध्ये २८ वर्ष असल्याचे मी खोटे सांगत आहे. माझ्या पत्नीचे शिक्षण बि.ए. होते. माझ्या पत्नीने दिनांक २४/०५/१९९० रोजी ती कोठे चाललेली आहे हे मला सांगितले नव्हते.

प्रश्न- दिनांक २४/०५/१९९० रोजी झालेल्या खरेदी पत्राची माहिती नाही ?

उत्तर त्या दिवशी मला माहिती मिळाली नाही. नंतर मला खरेदी पत्राची माहिती मिळाली.

हे म्हणणे खरे नाही की मला माझ्या पत्नीने केवेळ दिनांक ३/०३/१९९० च्या खरेदी पत्राची माहिती दिली होती.

प्रश्न- सन १९९० पासुन ते २०१५ पर्यंत, तुमच्या पत्नीने खरेदी पत्र पटवारी यांच्याकडे का नेले नाही अथवा तुम्हाला का दाखविले नाही ?

उत्तर- माझी पत्नी रांची येथील असुन, तिला केवळ हिंदी भाषेचे ज्ञान आणि थोळी इंग्रजी भाषेचे ज्ञान आहे तिला मराठी येत नाही. त्यामुळे तिने कागदपत्र केवळ सांभाळुन ठेवले.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या पत्नीला खरेदी पत्राची कोणतीही माहिती नव्हती आणि खरेदी पत्र केले नाही. हे म्हणणे खरे नाहीकी माझ्या पत्नीला मराठी येत नव्हती आणि तिने कोणतेही खरेदी पत्र केले नाही. हे म्हणणे खरे नाही की सन २००५ ते २०१८ च्या दरम्यान, माझ्या पत्नीची मालमत्ता आहे किंवा नाही याची मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी २००५ ते २०१८ च्या दरम्यान एजाज खान सोबत कोणताही संपर्क केला नाही. हे म्हणण खरे नाही की, सन २००५ पुर्वीचे ज दस्त ऐवज एजाज खानने आणुन दिले ते खोटे बनवुन आणुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३/०३/१९९० चे दस्त मला एजाज खान याने आणुन दिला होता आणि इतर कोणतेही दस्तऐवज दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मला गट नं. २२६ चा कोणताही सात-बारा मिळाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला २२६ चा सातबारा मिळाला नसल्यामुळे मी एजाज खान च्या मदतीने खोटे कागदपत्र बनवुन खोटा दावा दाखल केला आहे. माझा नि.५ चा अर्ज नामंजुर झाल्याचे मला माहित आहे. कोणत्या वर्षी माझा अर्ज नामंजुर झाला हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की अर्ज नामंजुर झाल्यानंतर मी, दावा मिळकतीचे खोटे फोटोग्राफ्स दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की दाव्यामध्ये दाखल कलेले कागदपत्र हे खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी प्रतिवादी क्र.३ ला मालक म्हणुन जाहिर केले आहे. हे म्हणणे खरे आहे की केवळ सातबारा च्या उता-यावर , १२३/१ वर प्रतिवादी क्र.३ चे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की सन २००६ चे खरेदी पत्र प्रतिवादी क्र.३ चे आहे.

हे म्हणणे खरे आहे की मी सदरचे विक्रीपत्र मी सन २००५ ते २०१८ पर्यंत आव्हानीत केले नव्हते. साक्षीदार स्वतः हुन सांगतो की मला माहित नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे कागदपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2024.09.09 12:04:04 +0530

दिनांक ३१.०८.२०२४ (एस.एम. सरोदे)

रामटेक दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)